पुण्य नगरी
जानेवारी २०१९ | कोल्हापूर

बापूजींमुळे गोरगरिबांना शिक्षणाची संधी

- डी. टी. शिर्के

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी १९५४ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करून ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या ध्येयाने प्रेरित होऊन शहरासह ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचे भाग्य आम्हाला लाभले, असे विचार शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. मंगळवारी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात ते बोलत होते.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी जुन्या बुधवार पेठेतील विवेकानंद कॉलेजच्या स्थापनेपासूनची माहिती दिली. बापूजींमुळे आज समाजात अनेक उद्योगपती, राजकारणी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, खेळाडू, लेखक, कवी, कलावंत, सैन्यदलातील अधिकारी निर्माण झाले आहेत. माजी महापौर महादेवराव आडगुळे, रमेश जादव, पी. सी. पाटील, ऋतुराज क्षीरसागर, आर. एस. भोगम, न्यायाधीश पंकज रजपूत यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शाहीर आझाद नायकवडी, शरदचंद्र साळुंखे, नंदकुमार रानभरे व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रभावती पाटील, राजश्री पाटील यांनी केले, तर आभार धीरज शिंदे यांनी मानले.

पुढारी
बुधवार २३ जानेवारी २०१९

कोल्हापूर : स्नेहमेळाव्यात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. शरदचंद्र साळुंखे, महादेवराव आडगुळे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. नंदकुमार रानभरे आदी.

माजी विद्यार्थ्यांनी पुस्तके भेट देऊन ज्ञानसंवर्धनाचे कार्य करावे

डॉ. शिर्के : 'विवेकानंद'मध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

कोल्हापूर : प्रतिनिधी

माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास दरवर्षी पुस्तके भेट दिल्यास ग्रंथालय समृद्ध होऊन ज्ञानसंवर्धनाचे कार्य घडेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालय येथे माजी विद्यार्थी असोसिएशनच्या वतीने आयोजित स्नेहमेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केल्याने खेड्यापाड्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले. माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी फेसबुक, ई-मेलद्वारे संपर्क साधून नवीन शैक्षणिक उपक्रम राबविण्याविषयी सूचना देऊन सहकार्य करावे.

प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला.

न्यायाधीश पंकज रजपूत, माजी महापौर महादेवराव आडगुळे, प्रा. रमेश जाधव, पी. सी. पाटील, ऋतुराज क्षीरसागर, आर. एस. भोगम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. शरदचंद्र साळुंखे, प्रा. नंदकुमार रानभरे, शाहीर आझाद नायकवडी यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. डॉ. प्रभावती पाटील, प्रा. राजश्री पाटील यांनी केले. प्रा. धीरज शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी

बुधवार, २३ जानेवारी २०१९

• **व्याख्यान** : विवेकानंद महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशवंत पाटणे यांचे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : ज्ञानसंस्कृतीचे दूत या विषयावर व्याख्यान. स्थळ : डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन, ताराबाई पार्क. वेळ : १०.०० वाजता.

तरुण भारत बुधवार, दि. २३ जानेवारी २०१९

राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत 'डीकेएएससी'च्या मुलांची बाजी

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त संस्थाअंतर्गत राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा दत्ताजीराव कदम महाविद्यालयात झाल्या. या स्पर्धेत सिनियर व ज्युनियर गटात मुलांमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक तर मुलींमध्ये कन्या महाविद्यालय आणि वाठार महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे : मुले - (सिनिअर गट) प्रथम : डीकेएएससी कॉलेज, द्वितीय : नागठाणे कॉलेज, तृतीय : एस.जी.के. कॉलेज लोणीकाळभोर. (ज्युनिअर गट) : प्रथम : डीकेएएससी कॉलेज, द्वितीय : स्वारा भारती ज्युनिअर कॉलेज तासगाव, तृतीय क्रमांक आर.पी. कॉलेज उस्मानाबाद. मुली- (सिनिअर गट) : प्रथम : कन्या महाविद्यालय, द्वितीय : विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय : राजे रामराव महाविद्यालय जत. (ज्युनिअर गट) : प्रथम : वाठार कॉलेज वाठार, द्वितीय : नागठाणे कॉलेज नागठाणे, तृतीय : श्रीबैळा कॉलेज, मेढा यांनी प्राप्त केला. उद्योगपती राजू तिवारी,प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते विजेत्या संघाना पारितोषिक देण्यात आली. यावेळी प्रा. कॅप्टन मोहन विरकर, प्रा. आकाश बनसोडे, प्रा. डॉ. सविता भोसले, प्रा.सुखदेव सजगणे तसेच सर्व क्रीडा प्रशिक्षक उपस्थित होते.

तरुण भारत
बुधवार, २३ जानेवारी २०१९

आजचे कार्यक्रम

- **व्याख्यान :** डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमाला. स्थळ : विवेकानंद कॉलेज. वेळ : सकाळी १० वाजता.